# नियमित दिवाणी दावा कमांक ४९९/२०१३ मधील निशाणी २१ खालील आदेश

१. वादींनी प्रस्तुतचा अर्ज आदेश २६ नियम ९ दिवाणी प्रकिया संहितेच्या तरतुदी अन्वये दाखल केलेला आहे. वादींनी अशा प्रकारे मागणी केली आहे की, दावा मिळकत ब आणि क ची मोजणी तालुका निरिक्षक, भूमिअभिलेख, वाळवा-इस्लामपूर मार्फत करण्यात यावी.

२. प्रस्तुतच्या अर्जाची थोडक्यात वस्तुस्थिती अशा प्रकारे आहे की, वादी कथन करतात की, दावा ब आणि क मिळकत ही वादींच्या खरेदी मालकी हक्काच्या मिळकती आहेत आणि दावा क मिळकतीमध्ये प्रतिवादींनी कथितरित्या अतिक्रमण केलेले आहे आणि म्हणून मोजणी तंज्ञामार्फत अतिकमित क मिळकतबाबतची मोजणी तालुका निरिक्षक, भूमिअभिलेख, वाळवा-इस्लामपूर यांच्यामार्फत होणे आवश्यक आहे आणि मोजणीच्या वेळेस दावा ब आणि क मिळकतींच्या हद्दी निश्चित करुन दावा क मिळकतीच्या बाबत निश्चित अतिक्रमणाचा तपशील अहवाल हा दप्तरी सदरी येणे आवश्यक आहे आणि त्यामुळे प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. वादींनी मागणी केली आहे की, तालुका निरिक्षक, भूमिअभिलेख, वाळवा-इस्लामपूर मार्फत दावा ब आणि क मिळकतींची मोजणी हद्दी निश्चित करुन अतिकमित क्षेत्रफळाचा तपशील मोजणी नकाशासह व अहवालासह दप्तरी सदरी सादर करण्याचे निर्देष देण्या यावेत. वादींनी विनंती केली आहे की, प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात यावा. म्हणून प्रस्तुतचा अर्ज.

३. प्रतिवादींनी म्हणणे दाखल केलेले नाही. म्हणून प्रस्तुतच्या अर्जाचे सुनावणीचे कामकाज प्रतिवादींविरुध्द युक्तीवादाशिवाय चालविण्यात आलेले आहे.

४. प्रस्तुतच्या अर्जाच्या वस्तुस्थितीचे अवलोकन केले. वादींच्या विद्वांन वकीलांना ऐकले. वादींच्या विद्वांन वकीलांनी युक्तीवादामध्ये *माणिकराव रामजी चवके विरुध्द अशोक अंबादास गवंडे २०१४ (२) एमएच.एल.जे. ८४०* या न्यायनिवाडयावर भर दिलेला आहे. दाखल केस लॉ मधील परिच्छेद कमांक ५ चे अवलोकन केलयानंतर स्पष्ट होते की, पक्षकारांमधील हद्दींचा वाद संपुष्टात आणण्यासाठी कार्यक्षम कॉडस्ट्रल सर्व्हेअरची न्यायिक आयोगाची नेमणुक मोजणी नकाशा तयार करण्यासाठी आदेश २६ नियम ९ दिवाणी प्रकिया संहितेच्या तरतुदीं अन्वये आवश्यक आहे. दाखल केस लॉमधील सिध्दांन्त प्रस्तुत अर्जाच्या वस्तुस्थितीला लागु केल्यानंतर स्पष्ट होते की, प्रस्तुतच्या अर्जामधील वस्तुस्थिती ही दावा क मिळकतीमधील कथितरित्या प्रतिवादींनी केलेल्या हद्दीच्या अतिकमणाच्या बाबत आहे आणि म्हणून दावा ब आणि क मिळकतींच्या हद्दी निश्चित करुन दावा क मिळकतीच्या निश्चित अतिकमणाचा तपशीलवार अहवाल मोजणी नकाशासकट दप्तरी सदरी वादींना गरजेचे वाटते आणि म्हणून हे स्पष्ट होते की, केस लॉमधील सिध्दांन्त प्रस्तुत अर्जाच्या वस्तुस्थितीला संपुर्णपणे लागु होतात आणि म्हणून दाखल केस लॉ युक्तीवादामध्ये स्वीकारण्यात आलेला आहे.

५. वादींच्या विद्वांन वकीलांनी दप्तरी सदरी दाखल केस लॉच्या आधारे सिध्द केले आहे की, दावा ब आणि क मिळकतींच्या हद्दी निश्चित करुन दावा क मिळकतीच्या बाबत निश्चित अतिकमणाचा तपशीलवार मोजणी नकाशासकट दप्तरी सदरी येणे योग्य होणार आहे. प्रतिवादींनी प्रस्तुतच्या अर्जाच्या सुनावणीकामी म्हणणे दाखल केले नसल्याने वादींच्या विद्वांन वकीलांनी सर्व युक्तीवाद अआव्हानात्मकरित्या स्वीकारण्याजोगा आहे असा निष्कर्ष काढण्यास काहीच हरकत नाही. मी या निष्कर्षास पोहचली आहे की, प्रस्तुतचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, उत्तरास मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

 नियमित दिवाणी दावा क्रमांक ४९९/२०१३
मधील निशाणी २१ खालील आदेश.

## आ दे श

१. अर्ज मंजूर.

२. तालुका निरिक्षक, भूमिअभिलेख, वाळवा यांची न्यायिक आयोग म्हणून नेमणुक करण्यात आली आहे. न्यायिक आयोगाने दावा ब आणि क मिळकतींच्या हद्दी निश्चित करुन मोजणी करावी आणि मोजणीमध्ये दावा क मिळकतीच्या हद्दी निश्चित करुन अतिक्रमणाचा माहितीपूर्वक अहवाल मोजणी नकाशासकट आदेश तारखेपासून एक महिन्याच्या कालावधीत न्यायालयात सादर करावा.

३. वादींनी न्यायिक शुल्क रक्कम रुपये २,०००/- (रक्कम रुपये दोन हजार मात्र) नियमाप्रमाणे न्यायालयात जमा करावे.

४. येणेप्रमाणे रिट जारी करण्यात यावी.

(वै.म.गोतसुर्वे)
तारीख : १३/०१/२०१५ सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
इस्लामपूर